॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' grad
Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: srtmunss2018@gmail.com

जा.क्र. : रासेयो/२०२२-२३/७९ दिनांक २६/०७/२०२२

## परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.
राष्ट्रीय सेवा योजना राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय: स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" व "घरो घरी तिरंगा" हा उपक्रम दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत राबविण्या बाबत.

संदर्भ:१:मा. विलास रा.थोरात, उपसचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे परिपत्रक क्र.संकिर्ण-८२२२ /प्र. क्र. ११०(भाग-२)/सां.का.४ दिनांक २० जुलै २०२२.
२ : मा. प्रताप लुबाळ, उपसचिव महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे परिपत्रक क्र.संकिर्ण-२०२२ /प्र. क्र ८२/आस्था-२, दिनांक २२ जुलै २०२२.
३: मा. कुलसचिव कार्यालयाचे पत्र क्र. आस्था/२ /२०२२-२३/१०८, दिनांक २६ जुलै २०२२

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पुर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढयाच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामात घडलेल्या विविध घटना यांचे स्मरण व्हावे, स्वातंत्र्यासाठी चेतवलेले स्फुल्लिंग कायम तेवत रहावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरूपी जनमानसात रहावी या उद्देशाने या दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत "हर घर तिरंगा" हा उपक्रम केंद्र शासनाच्या सुचने नुसार राबविण्याबाबत कळविले आहे.

त्या अनुषंगाने रा.से.यो संलग्नित सर्व महाविद्यालयांना या परिपत्रकान्वये सुचित करण्यात येते की, सर्व शासकिय/निमशासकिय संस्थांनी जास्तीत जास्त प्रसिध्दी करावी. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक माध्यमांचा जास्तीत जास्त वापर करावा. राष्ट्रध्वज हे हाताने कातलेल्या आणि हाताने विणलेल्या किंवा मशीनद्वारे तयार केलेल्या सुत/पॉलिस्टर/लोकर/सिल्क/खादी पासून बनविलेल्या कापडाचे असावेत.

१) "हर घर तिरंगा" या उपक्रमांतर्गत कार्यक्रमाची छायाचित्रे, चित्रफिती, ध्वनीमुद्रण इत्यादी केंद्र शासनाच्या संस्कृति मंत्रालयाच्या amritmahotsav.nic.in या संकेतस्थळावर अपलोड करावे.

२) #hargharjhanda या हॅशटॅगखाली समाज माध्यमांवर छायाचित्रे प्रसारित करावीत. राज्य/जिल्हा/माविद्यालयाचा उल्लेख करून सोशल मिडीयावर फोटो शेअर करावीत.

तसेच संदर्भ क्र. २ अन्वये केंद्र शासनाच्या सुचनांनुसार "हर घर तिरंगा" (घरोघरी तिरंगा) हा उपक्रम दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीमध्ये राबविण्यात यावा. सदर उपक्रम उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शासकिय/निमशासकिय कर्यालये, सर्व विद्यापीठे, महाविद्यालये,वसतिगृहे, निवासस्थाने इ. इमारतीवर राष्ट्रध्वज फडकविला जाईल याची खातरजमा सर्व संबधित अधिका-यांनी करावी. सदर उपक्रम राबवितांना त्यात प्रामुख्याने पुढिल बाबींचा समावेश करावा.

२...

१) प्रत्येक विभाग/उपविभाग, विद्यापीठ/ महाविद्यालय, कार्यालय यांच्या वेबसाइटच्या दर्शनी भागावर "घरो घरी तिरंगा" ही टॅगलाईन तसेच तिरंग्याचे चित्र प्रदर्शित करावे.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमार्फत प्रभात फेरीचे आयोजन करून या उपक्रमा बाबत पालक व नागरिकांमध्ये प्रचार, प्रसार व जाणीव/जागृती करावी. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकांचा समावेश करून मोठया प्रमाणावर आयोजन करावे.

३) सांस्कृतिक कार्य विभागाने सदर उपक्रमाच्या जागृती मोहिमेसाठी जिंगल, गीते, ध्वनीचित्रफित,इ.ची निर्मिती केली आहे. त्याबाबतची माहिती शासनाच्या https://mahaamrut.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर जिंगल्स, गीते, पोस्टर्स, इ. चा वापर शासकीय अधिकारी/कर्मचारी व सर्व नागरिकांनी देखील सदर उपक्रमाच्या प्रचार, प्रसारासाठी करावा.

त्या अनुषंगाने रा.से.यो. संलग्नित सर्व महाविद्यालयांनी दोन्ही अभियानाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना (NSS) रा.से.यो. स्वंयसेवक/स्वंयसेविका व राष्ट्रीय छात्रसेना (NCC) च्या माध्यमातून सहकार्य घेऊन आजादी का अमृत महोत्सव अंतर्गत "स्वराज्य महोत्सव" व "हर घर तिरंगा" (घरो घरी तिरंगा) हा उपक्रम उपरोक्त दिशानिर्देशांचे काटेकोर पणे अमंलबजावणी करून दोन्ही उपक्रम यशस्वी पणे राबविण्यात यावेत. व सदर उपक्रमाचे फोटो व अहवाल दिनांक १७/०८/२०२२ पर्यंत रा.से.यो. विभागाच्या nss@srtmun.ac.in या नविन ई-मेल पाठविण्यात यावेत. ही विनंती.

डॉ.मल्लिकार्जुन करजगी
संचालक राष्ट्रीय सेवा योजना विभाग
प्रस्तुत विद्यापीठ

प्रत: सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की सदरील परीपत्रक विद्यापीठाच्या रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत दिनांक १३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत विद्यापीठाच्या वेबसाइटच्या दर्शनी भागावर "घरो घरी तिरंगा" ही टॅगलाईन तसेच तिरंग्याचे चित्र प्रदर्शित करावे.सहकार्य करावे, ही विनंती.